ePaper

**'आता मी हवेत उडणारी बस आणणार', नितीन गडकरींचा नवा दावा**



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | गुरुवार, दि. 16 जुलै 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 3 वरुन...

"मोशीचा धडा; ११ डेपोचा आराखडा"

### साडेआठ किलो वजन घटले; न्यायालयात याचिका दाखल

# सोनम वांगचुक यांची प्रकृती चिंताजनक...

**महाईन्यूज । कोलकाता**

**शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक यांच्या दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या उपोषणाला १८ दिवस पूर्ण झाले असून, त्यांची प्रकृती चिंताजनक झाल्याचा दावा करत त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करून सक्तीने उपचार व अन्न देण्याची मागणी करणारी जनहित याचिका न्यायालयात दाखल करण्यात आली आहे.**

ही याचिका कार्यकर्ते व वकील राकेश कुमार सैनी यांनी दाखल केली आहे. उपोषणामुळे वांगचुक यांचे ८.५ किलो वजन कमी झाले असून, त्यांची प्रकृती झपाट्याने खालावत असल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे. त्यामुळे केंद्र सरकार आणि दिल्ली सरकारला आवश्यक निर्देश देण्याची मागणीही करण्यात आली आहे.

आंदोलनाच्या आयोजकांच्या माहितीनुसार, वांगचुक यांचा रक्तदाब १०७/७० MMHG तर रक्तातील साखरेची पातळी ६७ MG/DL पर्यंत खाली आली आहे. त्यांना उभे राहताना किंवा बसताना चक्कर येत असून, अत्यंत अशक्तपणा जाणवत असल्याचे सांगण्यात आले आहे. डॉक्टरांचे पथक त्यांच्या प्रकृतीवर सातत्याने लक्ष ठेवून आहे.

सीजेपीचे संस्थापक अभिजित दीपके यांनी आंदोलकांच्या मागण्यांचा गांभीर्याने विचार करण्याचे केंद्र सरकारला आवाहन केले आहे. वांगचुक यांचा मृत्यू झाला तर ती देशासाठी अत्यंत दुर्दैवी बाब ठरेल, असेही त्यांनी म्हटले आहे.

नीट पेपरफुटी प्रकरणानंतर सुरू झालेल्या या आंदोलनात वांगचुक यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. दरम्यान, आंदोलकांनी २० जुलै रोजी संसदेवर मोर्चा काढण्याची घोषणाही केली असून, आता या जनहित याचिकेवरील न्यायालयाच्या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



### सक्तीने उपचारासाठी न्यायालयात धाव

कार्यकर्ते व वकील राकेश कुमार सैनी यांनी न्यायालयात जनहित याचिका दाखल करून, सोनम वांगचुक यांना रुग्णालयात दाखल करून सक्तीने उपचार व अन्न देण्याचे निर्देश केंद्र व दिल्ली सरकारला द्यावेत, अशी मागणी केली आहे.

### २० जुलैला संसदेवर मोर्चा

सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला पाठिंबा देणाऱ्या संघटनांनी २० जुलै रोजी संसदेवर मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. आंदोलनाच्या मागण्यांवर केंद्र सरकारने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी आंदोलकांची मागणी आहे.

### ८.५ किलो वजन घटल्याचा दावा



आंदोलनाच्या आयोजकांच्या माहितीनुसार, उपोषणादरम्यान सोनम वांगचुक यांचे ८.५ किलो वजन कमी झाले आहे. त्यांचा रक्तदाब १०७/७० MMHG तर रक्तातील साखरेची पातळी ६७ MG/DL पर्यंत खाली आल्याचा दावा करण्यात आला असून, डॉक्टरांचे पथक त्यांच्या प्रकृतीवर सातत्याने लक्ष ठेवून आहे.

# "लाव रे भैयाला व्हिडिओ कॉल..." अन् भररस्त्यात कोयत्यांचा थरार!

## कौटुंबिक वादातून पुण्यातील कोथरूडमध्ये तरुणावर जीवघेणा हल्ला; 'भैया' कोण?

**महाईन्यूज । पुणे**

**पुण्यातील कोथरूड परिसरात भररस्त्यात एका तरुणावर कोयत्याने झालेल्या जीवघेण्या हल्ल्याने खळबळ उडाली आहे. मोबाईल शॉपीत काम करणारे अमित सुरेश शिंदे (३५) यांच्यावर मंगळवारी (१४ जुलै) सायंकाळी कर्वे रस्त्यावरील कोथरूड स्टँडजवळ कोयत्याने वार करण्यात आले. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले असून खासगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.**



या प्रकरणी अलंकार पोलीस ठाण्यात प्रशांत धुमाळ, त्याचे सहा ते सात साथीदार, तसेच अमित शिंदे यांची पत्नी ऋतुजा शिरगावकर, मेहुणा ऋषिकेश शिरगावकर आणि मामा प्रशांत नवघणे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राथमिक तपासात कौटुंबिक वादातून हा हल्ला झाल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

फिर्यादी अमित शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, पत्नी ऋतुजा शिरगावकर हिने यापूर्वी त्यांच्याविरोधात वारजे पोलीस ठाण्यात तक्रार केली होती. सध्या दोघेही वेगळे राहत असून, पत्नीचा भाऊ ऋषिकेश शिरगावकर याने सहा महिन्यांत जीवे मारण्याची धमकी दिल्याची तक्रारही अमित यांनी यापूर्वी पोलिसांकडे केली होती.

मंगळवारी सायंकाळी अमित शिंदे हे मोबाईल शॉपीबाहेर उभे असताना प्रशांत धुमाळ आणि त्याचे साथीदार तेथे आले. वाद घालत मारहाण सुरू केल्यानंतर "लाव रे भैयाला व्हिडिओ कॉल..." असे म्हणत व्हिडिओ कॉल करण्यास सांगण्यात आल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. त्यानंतर आरोपींनी कोयत्याने सपासप वार केल्याने अमित यांच्या डोक्यासह शरीरावर गंभीर जखमा झाल्या.

हल्ल्यानंतर रक्तबंबाळ अवस्थेत अमित यांनी घटनास्थळावरून पळ काढला. आरोपी पाठलाग करत असताना त्यांनी जवळील एका इमारतीच्या पार्किंगमध्ये लपून जीव वाचवला. त्यानंतर त्यांनी भावाला व मित्रांना फोन करून मदत मागितली. नातेवाईकांनी त्यांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल केले.

दरम्यान, या हल्ल्यामागे पूर्वनियोजित कट होता का, "भैया" म्हणून उल्लेख केलेली व्यक्ती नेमकी कोण आहे, व्हिडिओ कॉल कोणाला करण्यात आला होता आणि या संपूर्ण घटनेमागे कोणाचे नियोजन होते, याचा अलंकार पोलीस सखोल तपास करत आहेत.

### 'भैया' कोण? तपासाचा केंद्रबिंदू

हल्ल्यावेळी आरोपींकडून "लाव रे भैयाला व्हिडिओ कॉल..." असे बोलण्यात आल्याचा गंभीर आरोप फिर्यादीने केला आहे. त्यामुळे 'भैया' म्हणून उल्लेख केलेली व्यक्ती कोण, तिचा हल्ल्याशी काही संबंध आहे का आणि व्हिडिओ कॉलद्वारे हल्ल्याचे थेट प्रक्षेपण किंवा सूचना दिल्या जात होत्या का, याचा तपास पोलीस करत आहेत. सध्या या व्यक्तीची अधिकृत ओळख पोलिसांनी जाहीर केलेली नाही.

# रिपरिप पावसाने पुण्याला दिलासा; आता मुसळधार सरींची चाहूल



**महाईन्यूज । पुणे**

**सात ते आठ दिवसांच्या विश्रांतीनंतर पुण्यात बुधवारी पुन्हा पावसाने हजेरी लावली. शहराच्या विविध भागांत सकाळपासून अधूनमधून रिपरिप पाऊस पडत असून, काही ठिकाणी ऊन तर काही ठिकाणी हलक्या सरी अशा बदलत्या वातावरणाचा अनुभव नागरिकांना आला. त्यामुळे दिवसभर शहरात 'ऊन-पावसाचा खेळ' सुरू असल्याचे चित्र पाहायला मिळाले.**



गेल्या आठवडाभरापासून पावसाने विश्रांती घेतल्यामुळे शहरात उकाडा वाढला होता. बुधवारी मात्र अचानक ढगाळ वातावरण तयार झाले आणि हलक्या सरींनी वातावरणात गारवा निर्माण केला. कामावर जाणारे नोकरदार, विद्यार्थी तसेच दुचाकीस्वारांना कधी छत्री तर कधी रेनकोटचा आधार घ्यावा लागल्याने काहीशी गैरसोय झाली. दरम्यान, हलक्या पावसामुळे काही प्रमुख रस्त्यांवरील वाहतुकीचाही वेग मंदावला.

भारतीय हवामान विभागाने पुणे आणि परिसरासाठी पुढील काही दिवस बदलत्या हवामानाचा अंदाज व्यक्त केला आहे. विशेषतः २० जुलैनंतर पावसाचा जोर वाढण्याची शक्यता असून, काही भागांत मुसळधार पाऊस पडू शकतो, असा इशारा विभागाने दिला आहे. त्यामुळे नागरिकांनी हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन प्रवासाचे नियोजन करावे आणि आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

पावसाच्या पुनरागमनामुळे उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळाला असला, तरी आगामी काळात जोरदार पाऊस झाल्यास शहरातील सखल भागांत पाणी साचणे, वाहतुकीवर परिणाम होणे आणि दैनंदिन जनजीवन विस्कळीत होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. संभाव्य अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर महापालिका आणि संबंधित यंत्रणांनीही तयारी सुरू केली आहे.

### महापालिकेची यंत्रणा अलर्ट मोडवर

संभाव्य जोरदार पावसाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेकडून पावसाळी यंत्रणा सज्ज ठेवण्यात येत आहे. सखल भाग, नाले, पाणी साचणारे रस्ते आणि आपत्कालीन नियंत्रण कक्षावर विशेष लक्ष ठेवण्यात येणार आहे.

### २० जुलैनंतर मुसळधार पावसाची शक्यता

भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पुणे आणि परिसरात २० जुलैनंतर पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडू शकतो. त्यामुळे सखल भागांत पाणी साचणे, वाहतुकीचा वेग मंदावणे आणि दैनंदिन जनजीवनावर परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन नागरिकांनी हवामानाचा अंदाज पाहूनच प्रवासाचे नियोजन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### हवामान विभागाचा सतर्कतेचा इशारा

२० जुलैनंतर पुणे जिल्ह्यात पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. नागरिकांनी अनावश्यक प्रवास टाळावा, तसेच मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# "मोशीचा धडा; ११ डेपोचा आराखडा"

## तळवडे, वाकड, ताथवडे, पिंपळे निलखसह ११ संभाव्य जागांचा प्राथमिक सर्व्हे

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मोशी येथील दुर्दैवी दुर्घटनेनंतर पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने शहराच्या कचरा व्यवस्थापनासाठी पर्यायी उपाययोजनांना गती दिली आहे. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या निर्देशानुसार शहरातील तब्बल ११ संभाव्य ठिकाणांचा सर्व्हे करण्यात आला असून, पर्यायी कचरा डेपो उभारणीसाठी प्रशासनाकडून हालचाली सुरू झाल्या आहेत.**





मोशी येथील कचरा डेपोवरील वाढता ताण, भविष्यातील धोके आणि शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता, कचरा व्यवस्थापनाचे विकेंद्रीकरण करण्यावर प्रशासनाचा भर असल्याचे समोर येत आहे. यासाठी विविध भागांतील शासकीय, आरक्षित आणि महापालिकेच्या मालकीच्या जागांचा प्राथमिक स्तरावर अभ्यास करण्यात आला आहे.

प्रशासनाच्या सर्व्हेनुसार, तळवडे, म्हेत्रे उद्यान, यमुनानगर येथील ठाकरे उद्यान, नेहरुनगर बस डेपो अथवा हॉकी ग्राउंड, किवळे येथील प्रस्तावित कचरा संकलन केंद्र, पिंपरी-वाघेरे परिसरातील डिफेन्सची जागा, वाकड, पिंपळे निलख येथील आरक्षित भूखंड, कासारवाडी येथील एसटीपी प्रकल्पाशेजारील जागा तसेच ताथवडे येथील पशुसंवर्धन केंद्राच्या जागेचा पर्यायी कचरा डेपो म्हणून विचार करण्यात येत आहे.

विशेष म्हणजे, या सर्व ठिकाणांबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नसून, प्राथमिक सर्व्हे आणि व्यवहार्यता अहवालाच्या आधारे पुढील कार्यवाही केली जाणार आहे. स्थानिक नागरिकांच्या हरकती, पर्यावरणीय परिणाम, वाहतूक व्यवस्था आणि कायदेशीर बाबींचाही सखोल अभ्यास करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

मोशी दुर्घटनेनंतर शहरातील कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. दररोज निर्माण होणाऱ्या हजारो मेट्रिक टन कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी एका ठिकाणावर अवलंबून राहणे धोकादायक ठरू शकते, अशी भावना प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी यापूर्वीच कचरा व्यवस्थापनासाठी दीर्घकालीन आणि शाश्वत उपाययोजना राबविण्याचे संकेत दिले होते. त्यानुसार, शहरात छोट्या-छोट्या विकेंद्रित प्रक्रिया केंद्रांची उभारणी, बायोगॅस प्रकल्प, वेस्ट-टू-एनर्जी उपक्रम आणि पर्यायी डेपोची संकल्पना पुढे येत असल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, प्रस्तावित ठिकाणांच्या सर्व्हेमुळे संबंधित परिसरातील नागरिकांमध्ये उत्सुकता आणि चिंता दोन्ही निर्माण झाली आहे. भविष्यात या ठिकाणांवर प्रत्यक्ष कचरा डेपो उभारले जाणार का, याबाबत प्रशासनाकडून अधिकृत घोषणा होणे बाकी आहे.

### कुठे होऊ शकतात नवे डेपो?

तळवडे, म्हेत्रे उद्यान, ठाकरे उद्यान, नेहरुनगर, किवळे, पिंपरी-वाघेरे, वाकड, पिंपळे निलख, कासारवाडी, ताथवडे आदी ठिकाणांचा महापालिकेकडून प्राथमिक सर्व्हे करण्यात आला आहे.

### विकेंद्रित कचरा व्यवस्थापनावर भर

एका डेपोवर अवलंबून राहण्याऐवजी शहरात छोट्या-छोट्या प्रक्रिया केंद्रांद्वारे कचरा व्यवस्थापन करण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे. यासाठी बायोगॅस, वेस्ट-टू-एनर्जी आणि पर्यायी डेपो उभारणीचा आराखडा तयार केला जात आहे.

# “पुणे-नाशिक रेल्वेसाठी आता सुधीर मुंगसे यांची जनआंदोलनाची हाक!





**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पुणे-नाशिक रेल्वे प्रकल्पाला गती मिळावी आणि विशेषतः राजगुरुनगर-चाकण मार्गाचा समावेश व्हावा, यासाठी आता जनआंदोलनाची गरज असल्याचे मत मी सेवेकरी सोशल फाउंडेशनचे संस्थापक-अध्यक्ष सुधीर विठ्ठल मुंगसे यांनी व्यक्त केले आहे. “पुणे-नाशिक रेल्वे हा केवळ एक पायाभूत सुविधा प्रकल्प नसून, तो शिक्षण, रोजगार, उद्योग, शेती आणि संपूर्ण परिसराच्या आर्थिक प्रगतीचा महामार्ग आहे,” असे त्यांनी सांगितले.**

मुंगसे यांनी प्रसिद्ध केलेल्या जनजागृती मोहिमेत नागरिकांना काही महत्त्वाचे प्रश्न विचारले आहेत. आपल्या मुलांना शिक्षणासाठी बाहेर का जावे लागते? तरुणांना नोकरीसाठी दररोज तासन्तास प्रवास का करावा लागतो? शेतकऱ्यांना आपला माल बाजारपेठेत पोहोचवण्यासाठी अधिक वेळ आणि खर्च का सहन करावा लागतो? या सर्व प्रश्नांचे उत्तर पुणे-नाशिक रेल्वे प्रकल्पात दडले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

त्यांच्या मते, राजगुरुनगर-चाकण मार्गाने रेल्वे सुरू झाल्यास विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि जलद प्रवासाची सुविधा मिळेल. युवकांना पुणे आणि नाशिक दरम्यान रोजगार व व्यवसायाच्या नव्या संधी उपलब्ध होतील. तसेच, चाकण आणि परिसरातील औद्योगिक वसाहतींना थेट रेल्वे संपर्क मिळाल्याने उद्योग क्षेत्रालाही मोठी चालना मिळेल.

शेतकऱ्यांच्या दृष्टीनेही हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे. कृषी माल कमी वेळेत मोठ्या बाजारपेठांपर्यंत पोहोचेल, वाहतूक खर्चात बचत होईल आणि शेतकऱ्यांना अधिक चांगला दर मिळण्यास मदत होईल. याशिवाय, रेल्वेमुळे स्थलांतराचे प्रमाण कमी होऊन अनेक कुटुंबे एकत्र राहू शकतील, असेही मुंगसे यांनी नमूद केले.

> “पुणे-नाशिक रेल्वे हा केवळ रेल्वे ट्रॅकचा विषय नाही. हा आपल्या मुलांच्या शिक्षणाचा, तरुणांच्या रोजगाराचा, शेतकऱ्यांच्या समृद्धीचा आणि उद्योगांच्या भवितव्याचा प्रश्न आहे. राजगुरुनगर-चाकण मार्गासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे आवाज उठवला, तरच हा प्रकल्प प्रत्यक्षात येईल.”
>
> - **सुधीर विठ्ठल मुंगसे,** संस्थापक-अध्यक्ष, मी सेवेकरी सोशल फाउंडेशन.

### राजगुरुनगर-चाकण मार्गावर भर

पुणे-नाशिक रेल्वे प्रकल्पात राजगुरुनगर-चाकण मार्गाचा समावेश झाल्यास शिक्षण, उद्योग, शेती आणि रोजगार क्षेत्राला मोठा फायदा होईल. त्यामुळे या मार्गाचा आराखड्यात समावेश करण्यासाठी नागरिकांनी लोकप्रतिनिधींमार्फत शासनाकडे पाठपुरावा करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### पुणे-नाशिक रेल्वेमुळे अपेक्षित फायदे

विद्यार्थ्यांना जलद व सुरक्षित प्रवास, युवकांसाठी रोजगार व व्यवसायाच्या नव्या संधी, चाकण-राजगुरुनगर औद्योगिक पट्ट्याला चालना, शेतमालाची कमी खर्चात वाहतूक, स्थानिक व्यवसाय आणि रिअल इस्टेटला प्रोत्साहन तसेच स्थलांतर कमी होऊन सामाजिक स्थैर्य वाढण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.



## भूमिका

# शाळाबाह्य कामांत अडकलेले शिक्षक; विद्यार्थ्यांचे नुकसान



**राज्याच्या शिक्षण व्यवस्थेसमोर आज उभा असलेला सर्वांत गंभीर प्रश्न म्हणजे शिक्षकांवर सातत्याने टाकली जाणारी अशैक्षणिक कामांची जबाबदारी. विद्यार्थ्यांना ज्ञान देणे, त्यांचा सर्वांगीण विकास घडवणे हे शिक्षकांचे मूलभूत कर्तव्य असताना त्यांना मतदारयादी पुनरीक्षण, विविध सर्वेक्षणे, प्रशिक्षणे, प्रशासकीय नोंदी आणि इतर सरकारी कामांमध्ये गुंतवले जात आहे.**

परिणामी वर्गात विद्यार्थी असतात; पण शिक्षक मात्र गावोगावी सरकारी कामे पार पाडताना दिसतात. ही परिस्थिती शिक्षणव्यवस्थेसाठी अत्यंत चिंताजनक आहे. शिक्षण हक्क कायद्यात शिक्षकांची जबाबदारी स्पष्ट करण्यात आली आहे. जनगणना, निवडणुका किंवा नैसर्गिक आपत्ती यांसारख्या अपवादात्मक परिस्थितीतच शिक्षकांची मदत घेण्याची तरतूद आहे.

मात्र प्रत्यक्षात वर्षभर BLO, SIR, विविध पोर्टलवरील माहिती भरणे, प्रशासकीय अहवाल आणि अनेक सरकारी मोहिमांमध्ये शिक्षकांना गुंतवले जाते. यामुळे अध्यापनासाठी आवश्यक असलेला वेळ आणि मानसिक एकाग्रता दोन्ही बाधित होतात.

अलीकडे अनेक जिल्ह्यांमध्ये शिक्षकांना आठवडे-आठवडे शाळांपासून दूर ठेवून विविध सरकारी कामांवर नियुक्त करण्यात आले. परिणामी विद्यार्थ्यांचे नियमित अध्यापन विस्कळीत झाले आहे. शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच सेतू अभ्यासक्रमासारखे महत्त्वाचे उपक्रम अपूर्ण राहतात. विद्यार्थ्यांच्या अभ्यासातील पोकळी भरून काढण्याऐवजी ती अधिक वाढत जाते. त्याचा थेट परिणाम शिक्षणाच्या गुणवत्तेवर होतो. यातील मोठा विरोधाभास म्हणजे शिक्षणाची गुणवत्ता घसरली तर जबाबदार शिक्षकांना धरले जाते; मात्र त्यांच्यावर लादल्या जाणाऱ्या अतिरिक्त कामांकडे दुर्लक्ष केले जाते. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी शिक्षकांना वर्गात वेळ मिळणे, अभ्यासाची तयारी करणे आणि विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष देणे आवश्यक असते.

हेच जर शक्य होत नसेल, तर दर्जेदार शिक्षणाची अपेक्षा कशी ठेवणार? राज्यात महसूल, ग्रामविकास, स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर विभागांमध्ये मोठे कर्मचारीबळ उपलब्ध आहे. तसेच बेरोजगार युवक, सेवानिवृत्त कर्मचारी किंवा कंत्राटी मनुष्यबळ यांचीही मदत अशा कामांसाठी घेतली जाऊ शकते. त्यामुळे शिक्षकांना त्यांच्या मूळ कर्तव्यापासून दूर ठेवण्याचे कोणतेही ठोस कारण उरत नाही.

शिक्षकांनी ९ जुलै रोजी राज्यभर काढलेल्या मोर्चामध्ये "आम्हाला शिकवू द्या" ही मागणी केली, ही बाब शासनासाठी आत्मपरीक्षणाची आहे. शिक्षकांना अध्यापनाची परवानगी मागावी लागते, यापेक्षा मोठे दुर्दैव दुसरे कोणते? शिक्षक हे हरकामे कर्मचारी नाहीत, तर राष्ट्राचे भविष्य घडवणारे शिल्पकार आहेत.

त्यांचा वेळ सरकारी मोहिमांमध्ये वाया घालवण्याऐवजी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी राखून ठेवणे ही शासनाची जबाबदारी आहे. शिक्षणाला प्राधान्य द्यायचे असेल, तर शिक्षकांना अशैक्षणिक कामांतून मुक्त करून त्यांच्या हातात पुन्हा खडू आणि पुस्तक देण्याची वेळ आता आली आहे. कारण सक्षम शिक्षकच सक्षम विद्यार्थी घडवू शकतात आणि सक्षम विद्यार्थीच उद्याचा सक्षम भारत निर्माण करू शकतात.

## प्रासंगिक »

### मनःशांतीचे रहस्य

**एका गावात एक महात्मा राहत होते. ते अत्यंत शांत, संयमी आणि हसतमुख होते. कोणी त्यांच्याशी उद्धटपणे वागले किंवा अपमान केला, तरी त्यांना कधी राग येत नसे.**

काही लोकांनी त्यांचा संयम तपासण्यासाठी मुद्दाम त्रास दिला, पण त्यांनी कधीही संताप व्यक्त केला नाही.

एके दिवशी काही जणांनी त्यांना विचारले, "महाराज, तुम्ही इतके शांत कसे राहता?" त्यावर महात्मा म्हणाले, "ज्यांचे ध्येय उंच असते, ते क्षुल्लक गोष्टींवर प्रतिक्रिया देत नाहीत. दुसऱ्यांच्या वागण्यामुळे आपल्या मनात द्वेष किंवा राग साठवू नये. लोकांना काय वाटते यापेक्षा आपण मन शुद्ध ठेवणे अधिक महत्त्वाचे आहे."

ते पुढे म्हणाले, "जमीन सर्वांचा भार सहन करते आणि कितीही त्रास झाला तरी क्षमा करते. तिच्याकडून क्षमाशीलता शिकावी. आपल्या गरजा मर्यादित ठेवल्या आणि सर्वांप्रती करुणा व समभाव ठेवला, तर मन नेहमी शांत राहते."

- तात्पर्य : उच्च विचार, क्षमाशीलता आणि समभाव यांमुळेच खरी मनःशांती प्राप्त होते.

देशाच्या राजकारणात आणि प्रशासनात पारदर्शकता ही लोकशाहीची मूलभूत अट मानली जाते. मात्र अलीकडील काही घडामोडींमुळे प्रश्न अधिक निर्माण होत आहेत, तर उत्तरे मात्र मिळत नाहीत.

# गूढ अधिक गहिरे; उत्तरांची प्रतीक्षा!

अयोध्येतील राममंदिरातील कथित आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपांवर प्रमुख राजकीय पक्षांचे मौन, केंद्रीय पर्यावरण मंत्रालयातील अचानक झालेली कारवाई आणि लॉरेन्स बिश्नोईच्या संभाव्य प्रत्यार्पणाचा मुद्दा या तीन घटनांनी अनेक शंका उपस्थित केल्या आहेत.

राममंदिर दानप्रकरणात काँग्रेस आणि भाजप या दोन्ही पक्षांच्या सर्वोच्च नेतृत्वाने मौन बाळगले आहे. विरोधी पक्ष सरकारवर टीका करत असला तरी राहुल गांधी यांची प्रतिक्रिया नाही. दुसरीकडे, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही या विषयावर भाष्य टाळले असून तपास सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे. तपास पूर्ण होईपर्यंत संयम राखणे योग्य असले, तरी लोकांच्या मनातील प्रश्नांची उत्तरे देण्याची जबाबदारीही सरकार आणि विरोधकांचीच असते.

संवेदनशील धार्मिक विषयांवर राजकीय गणितांपेक्षा सत्याला प्राधान्य मिळणे आवश्यक आहे. याहून अधिक चर्चेचा विषय ठरला तो केंद्रीय पर्यावरण मंत्रालयातील घडामोडींचा. पर्यावरणमंत्री



भूपेंद्र यादव यांच्या कार्यालयातील चार अधिकाऱ्यांना अवघ्या दोन दिवसांत पदावरून हटविण्यात आले. या निर्णयामागील कारण अधिकृतपणे स्पष्ट करण्यात आलेले नाही. कोणत्याही केंद्रीय मंत्र्यांच्या कार्यालयातील एवढ्या मोठ्या प्रमाणावर अचानक कारवाई होणे ही सामान्य बाब नाही. जर गंभीर कारण असेल, तर त्याबाबत आवश्यक ती माहिती सार्वजनिक करणे हे पारदर्शक प्रशासनाचे लक्षण ठरले असते. अन्यथा अफवा आणि तर्कवितर्कांना खतपाणी मिळते.

दरम्यान, लॉरेन्स बिश्नोईच्या संभाव्य प्रत्यार्पणाच्या चर्चेने भारत-अमेरिका संबंधांच्या नव्या पैलूला वाचा फोडली आहे. भारताच्या ताब्यात असलेल्या आरोपीला अमेरिकेने प्रत्यार्पणासाठी औपचारिक मागणी केल्यास कायदेशीर आणि राजनैतिक गुंतागुंत निर्माण होऊ शकते. अशा प्रकरणांमध्ये आंतरराष्ट्रीय करार, न्यायालयीन प्रक्रिया आणि राष्ट्रीय हित यांचा समतोल राखणे अत्यंत महत्त्वाचे असते. या तीनही घटनांचा समान धागा म्हणजे माहितीचा अभाव आणि वाढणारे गूढ. लोकशाही व्यवस्थेत जनतेचा विश्वास टिकवायचा असेल, तर केवळ निर्णय घेणे पुरेसे नसते; त्या निर्णयामागील कारणेही स्पष्ट करावी लागतात. मौन, गुप्तता आणि अस्पष्टता यामुळे संशय अधिक गडद होतो. शासन असो किंवा विरोधी पक्ष, उत्तरदायित्वापासून कोणीही अलिप्त राहू शकत नाही. पारदर्शकता, जबाबदारी आणि वेळेवर दिलेली स्पष्ट माहिती हीच लोकशाहीची खरी ताकद आहे. अन्यथा गूढ अधिक गहिरे होत जाते आणि त्याची सर्वांत मोठी किंमत लोकविश्वासाला मोजावी लागते.

## ।। अभंगवाणी ।।



वंदूं चरणरज सेवूं उष्टावळी ।
पूर्वकर्मा होळी करुनी सांडूं ॥१॥

अमुप हे गांठीं बांधूं भांडवल ।
अनाथा विठ्ठल आम्हां जोगा ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# एसटीची भाडेवाढ कायम; प्रवाशांना दिलासा नाही!

## डिझेल, टायर व सुट्या भागांच्या वाढत्या खर्चामुळे १०% वाढ ३१ जुलैपर्यंत लागू

**महाईन्यूज । मुंबई**

**वाढत्या डिझेलच्या किंमती आणि एसटी महामंडळाच्या वाढलेल्या खर्चामुळे राज्यातील एसटी प्रवाशांना दिलासा मिळण्याची शक्यता सध्या तरी नाही. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एमएसआरटीसी) लागू केलेली १० टक्के हंगामी भाडेवाढ ३१ जुलैपर्यंत कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.**



यापूर्वी १५ एप्रिल ते १५ जून या कालावधीत ही भाडेवाढ लागू करण्यात आली होती. त्यानंतर एक महिन्याची मुदतवाढ देण्यात आली होती. आता ही मुदत आणखी वाढवून ३१ जुलैपर्यंत करण्यात आली आहे.

एसटी महामंडळाच्या माहितीनुसार, जागतिक घडामोडींमुळे डिझेलचे दर वाढले असून बसगाड्यांचे सुटे भाग, टायर तसेच देखभाल खर्चातही मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे आर्थिक भार कमी करण्यासाठी भाडेवाढ आवश्यक असल्याचे महामंडळाचे म्हणणे आहे. राज्यातील ३१ विभागांपैकी २२ विभागांना स्वतःचा खर्च भागवण्यासाठी आवश्यक महसूलही मिळत नसल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, राज्य सरकारने एसटी महामंडळाला कर्मचाऱ्यांचे वेतन आणि इतर खर्च स्वतःच्या उत्पन्नातून भागवण्यासाठी विविध उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

याचबरोबर, राज्यातील एसटी महामंडळाच्या मालकीच्या ८ हजार ३३१ जागांचा टप्प्याटप्प्याने विकास करण्याचा निर्णयही सरकारने घेतला आहे. या प्रकल्पाला मुख्यमंत्री यांनी मंजुरी दिली असून पुढील दोन महिन्यांत निविदा प्रक्रिया सुरू होणार आहे. राज्यातील तालुका, शहर आणि ग्रामीण भागात आधुनिक बस पोर्ट उभारण्याचे नियोजन असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

तसेच, एसटीच्या जागांभोवती ७८ हजार झाडे लावण्याचा संकल्प करण्यात आला असून पर्यावरण संवर्धनासाठी महामंडळ कटिबद्ध असल्याचेही सरनाईक यांनी स्पष्ट केले.

### ८,३३१ जागांचा विकास

एसटी महामंडळाच्या राज्यभरातील ८ हजार ३३१ जागांचा टप्प्याटप्प्याने विकास केला जाणार आहे. आधुनिक बस पोर्ट उभारण्यासाठी पुढील दोन महिन्यांत निविदा प्रक्रिया राबवली जाणार असून, एसटीच्या जागांभोवती ७८ हजार झाडे लावण्याचाही संकल्प करण्यात आला आहे.

# दुबार पेरणीच्या संकटात शेतकऱ्यांना दिलासा; बाधितांना मोफत बियाणे देणार





**महाईन्यूज । नागपूर**

**विदर्भासह राज्यातील अनेक भागांत पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांसमोर दुबार पेरणीचे संकट निर्माण होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारा निर्णय घेतला असून, बोगस बियाणे किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास बाधित शेतकऱ्यांना मोफत बी-बियाणे उपलब्ध करून दिले जाणार आहेत. ही माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर दिली.**

### डीपीडीसी निधीतून मोफत बियाणे

बोगस बियाणे किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान होऊन दुबार पेरणीची वेळ आल्यास बाधित शेतकऱ्यांना जिल्हा नियोजन समिती (डीपीडीसी) निधीतून मोफत बी-बियाणे उपलब्ध करून दिले जाणार आहेत. यासाठी संबंधित जिल्ह्याचे पालकमंत्री आवश्यक निधी उपलब्ध करून देणार असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

### शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा

दुबार पेरणीची वेळ आल्यास शेतकऱ्यांना स्वतःच्या खर्चाने बियाणे खरेदी करावे लागणार नाही. डीपीडीसी निधीतून मोफत बी-बियाणे उपलब्ध करून देण्याचा निर्णय सरकारने घेतल्याने शेतकऱ्यांवरील आर्थिक भार कमी होणार आहे.

ठाण्यात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना म्हस्के यांनी सांगितले की, शिवसेना शहरप्रमुख रमेश म्हात्रे यांच्याविरोधातील घटनेची गंभीर दखल पक्षाने घेतली आहे. पक्षप्रमुख तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार रमेश म्हात्रे यांना 'कारणे दाखवा' नोटीस बजावण्यात आली असून, त्यांच्याकडून स्पष्टीकरण मागविण्यात आले आहे. या प्रकरणातील पुढील निर्णय पक्षाची शिस्तपालन समिती आणि वरिष्ठ नेते घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

"कायदा सर्वांसाठी समान आहे. या प्रकरणातील कायदेशीर प्रक्रिया स्वतंत्रपणे सुरू राहील. कोणालाही पाठिशी घालण्याचा किंवा चौकशीत हस्तक्षेप करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही," असेही म्हस्के यांनी स्पष्ट केले.

यावेळी त्यांनी मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील 'मिसिंग लिंक' प्रकल्पावरून सुरू असलेल्या राजकीय टीकेलाही उत्तर दिले. हा प्रकल्प तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात सुरू झाला आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पूर्णत्वाच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्राला जागतिक दर्जाचा हा प्रकल्प दोन्ही नेत्यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे मिळाल्याचा दावा त्यांनी केला.

एकनाथ शिंदे यांच्या कार्यपद्धतीचे कौतुक करताना, कोणतीही आपत्ती किंवा दुर्घटना घडल्यास ते स्वतः घटनास्थळी जाऊन मदत व बचावकार्याचा आढावा घेतात, त्यामुळेच जनतेत त्यांच्याविषयी विश्वास असल्याचे म्हस्के म्हणाले.

याचवेळी त्यांनी उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्यावरही टीका केली. "सरकारवर सातत्याने बिनबुडाचे आरोप करून सनसनाटी निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र, अशा वक्तव्यांना जनता गांभीर्याने घेत नाही," असा टोला त्यांनी लगावला.

### ६१ टक्के पेरणी पूर्ण

कृषी विभागाच्या माहितीनुसार, नागपूर जिल्ह्यात आतापर्यंत २ लाख ९६ हजार ६७४ हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली असून ती अपेक्षित क्षेत्राच्या ६१ टक्के आहे. सोयाबीन व कापसाची जवळपास संपूर्ण पेरणी झाली असली, तरी भात लागवड अजूनही रखडली आहे.

# इराणचे माजी राष्ट्राध्यक्ष इस्रायली एजंट?

## एका सिक्रेट ऑपरेशनमध्ये सहभागी केल्याची धक्कादायक माहिती समोर

**महाईन्यूज | इराण**

**इस्रायली गुप्तचर यंत्रणा ‘मोसाद’ने थेट इराणच्या माजी राष्ट्राध्यक्षांना एका सिक्रेट ऑपरेशनमध्ये सहभागी केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. एकेकाळी इराणचे कट्टरपंथीय असलेले नेते व माजी राष्ट्राध्यक्ष महमूद अहमदीनेजाद यांनाच ‘मोसाद’ने सिक्रेट एजंट बनवण्याचा प्रयत्न केला होता. इराणमधील अयातुल्ला अली खामेनी यांची राजवट उलथवून टाकल्यानंतर अहमदीनेजाद यांच्याकडे इराणचे नेतृत्व इस्रायलला सोपवायचे होते.**



दरम्यान, अहमदीनेजाद यांनी सोमवारी (१३ जुलै) या वृत्तावर तीव्र आक्षेप घेत हे ‘हॉलिवूड स्टाईल’ खोटे वृत्त असल्याचे म्हटले. तसेच आपण मोसादच्या कोणत्याही कटकारस्थानाचा भाग नव्हतो, असे स्पष्ट केले आहे. तर त्यांच्या कार्यालयाने ‘न्यूयॉर्क टाइम्स’ हे “फेक न्यूज आणि खोटे रंगवून सांगण्यासाठी ओळखले जाते”, असे म्हटले आहे. मोसादचे नियोजन नेमके काय होते, त्यात अहमदीनेजाद यांना कसे सामावून घेण्यात आले याबाबत जाणून घेऊ.

इराणचे माजी राष्ट्राध्यक्ष अहमदीनेजाद यांना सिक्रेट ऑपरेशनमध्ये सहभागी करण्याचा अध्याय हंगेरी या देशात सुरू झाला. हंगेरीमध्ये हवामानाबाबतची एक परिषद बोलावण्यात आली. परंतु, या परिषदेआड मोसादने अहमदीनेजाद यांच्याशी संधान साधले. मोसादची त्यांच्याबरोबर एक गुप्त बैठक झाली.

हंगेरीतील ‘लुडोविका युनिव्हर्सिटी ऑफ पब्लिक सर्व्हिस’ या विद्यापीठातील प्रमुख असलेल्या रेक्टर (विद्यापीठातील प्रमुखाचे हे पद आहे) गेर्गेली डेली यांच्याशी हंगेरी सरकारमधील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने संपर्क साधला. विद्यापीठाकडून एक हवामानाशी संबंधित परिषद आयोजित करा व त्यात अहमदीनेजाद यांना प्रमुख पाहूणे म्हणून बोलवा, असे रेक्टर डेली यांना सांगण्यात आले.

हंगेरीची राजधानी बुडापेस्ट येथे होणाऱ्या या परिषदेत इस्रायली गुप्तचर यंत्रणेचे अधिकारी आणि अहमदीनेजाद यांच्यात एक सिक्रेट बैठक होईल, असेही रेक्टर डेली यांना सांगण्यात आले होते. वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत रेक्टर डेली म्हणाले, अहमदीनेजाद यांना आमंत्रण देणे मला चिंताजनक वाटत होते. पण, या बैठकीमुळे दोन्ही देशांमधील तणाव कमी होईल व अनेकांचे जीव वाचतील असा विश्वास वाटत होता. त्यामुळे अहमदीनेजाद यांना आमंत्रण देण्यासाठी आपण राजी झालो, असे रेक्टर डेली ‘न्यूयॉर्क टाइम्स’ला म्हणाले.

### २८ फेब्रुवारी रोजी काय घडले?

इराणमधील सर्वोच्च नेतृत्वाला संपवल्यानंतर त्यांच्या जागी इराणचे माजी राष्ट्राध्यक्ष महमूद अहमदीनेजाद यांना तात्काळ नियुक्त करावे, असे नियोजन इस्रायलने केले होते. परंतु, नियोजनाप्रमाणे गोष्टी घडल्या नाही. त्याच दिवशी इस्रायलने केलेल्या हल्ल्यात अहमदीनेजाद यांच्या घराच्या संरक्षण भिंतीचे नुकसान झाले. या हल्ल्यानंतर ‘प्युजो’ (PEUGEOT) कंपनीची एक काळ्या रंगाची कार अहमदीनेजाद यांच्या घरासमोर आली. या कारमधून माजी राष्ट्राध्यक्ष अहमदीनेजाद यांना एका सुरक्षितस्थळी हलवण्यात आले, अशी माहिती इराणच्या चार वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली आहे. या कारमध्ये मोसादचे एजंट होते. त्यांनी अहमदीनेजाद यांना एका सुरक्षित व गुप्त ठिकाणी नेले, असे या ऑपरेशनशी संबंधित अमेरिका व इराणच्या अधिकाऱ्यांनी ‘न्यूयॉर्क टाइम्स’ला सांगितले.

### २०२४ नंतर पुढील वर्षी बुडापेस्टमधील विद्यापीठाला भेट

२०२४ नंतर पुढील वर्षी अहमदीनेजाद हे पुन्हा एकदा बुडापेस्टमधील विद्यापीठाला भेट देण्यासाठी आले होते. या भेटीत ‘मोसाद’ने त्यांना एका सिक्रेट ऑपरेशनसाठी प्रशिक्षण दिले होते. हा इस्रायलच्या दीर्घकालीन नियोजनाचा एक भाग होता. योग्य वेळ येताच अहमदीनेजाद यांच्याकडे इराणचे नेतृत्व सोपवण्यासाठी ‘मोसाद’चे एजंट्स तयारी करत होते, अशी माहिती या घडामोडींशी संबंधित असलेल्या अमेरिकी व इराणी अधिकाऱ्यांनी नाव न सांगण्याच्या अटीवर ‘न्यूयॉर्क टाइम्स’ला दिली.

# 'तुमचा अंत पाहत नाही, तोपर्यंत मी जिवंत राहीन'; ममता बॅनर्जी

**महाईन्यूज | नवी दिल्ली**

**तृणमूल काँग्रेस (TMC) सोडणाऱ्या अनेक बंडखोर नेत्यांनी अभिषेक बॅनर्जी यांच्यावर मनमानी कारभाराचे आरोप केले असतानाच, पक्षाच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी बुधवारी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिलेल्या आहेत. ममता यांनी 'गद्दारांच्या वतीने' जनतेची माफी मागितली आणि आपण किंवा आपल्या कुटुंबाने राजकीय अस्तित्व वाचवण्यासाठी कधीही तडजोड केली नसल्याचा दावा करत "माझ्या पुतण्याला पक्षावर हल्ला करण्यासाठी केवळ एक 'निमित्त' बनवले गेले आहे.**



मला हार्ट अटॅक यावा अशी त्यांची इच्छा आहे, पण जोपर्यंत मी तुमचा अंत पाहत नाही, तोपर्यंत मी जिवंत राहीन." अशा शब्दांमध्ये ममता बॅनर्जी यांनी भाजपवर निशाणा साधला.


'फेसबुक' लाईव्हच्या माध्यमातून पक्षाच्या कार्यकर्त्यांना संबोधित करताना ममता बॅनर्जी म्हणाल्या की, "अभिषेक बॅनर्जी यांना फक्त एक निमित्त बनवले गेले आहे. त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना समन्स बजावण्यात आले. जर त्यांना हवे असते तर ते दिलासा मिळवू शकले असते, परंतु ते मैदान सोडून पळाले नाहीत. त्यांनी ज्या प्रकारे लढा सुरू ठेवला, त्याने त्यांच्या सर्व त्रुटी माफ झाल्या आहेत."

गेल्या काही आठवड्यांत ममता बॅनर्जी यांची साथ सोडणाऱ्या अनेक ज्येष्ठ नेत्यांनी अभिषेक बॅनर्जी यांच्यावर पक्ष हुकूमशाही पद्धतीने चालवल्याचा आणि भीतीचे वातावरण निर्माण केल्याचा आरोप केला होता. या पक्षांतर करणाऱ्या नेत्यांवर निशाणा साधत ममता बॅनर्जी म्हणाल्या, "मी गद्दारांच्या वतीने लोकांची माफी मागते. राजकीय अस्तित्व वाचवण्यासाठी मी माझा 'विवेक' विकलेला नाही."

तडजोड करण्यास नकार दिल्यामुळेच आपल्याला आणि आपल्या कुटुंबाला सतत राजकीय छळाचा सामना करावा लागला, असा आरोप माजी मुख्यमंत्र्यांनी केला. त्या म्हणाल्या, "जर मी तडजोड केली असती, तर आम्हाला एवढा त्रास सहन करावा लागला नसता. ज्यांनी तडजोड केली आहे, त्यांचे स्वतःचे काही आग्रह आणि दुराग्रह आहेत." असा आरोपही त्यांनी केला. भाजप तपास यंत्रणा आणि पोलिसांचा वापर करून नेत्यांना पक्षांतर करण्यास भाग पाडत असल्याचा आरोप माजी मुख्यमंत्र्यांनी केला.

### 'मदन मित्रा यांनी कालच सांगितले होते की समन्स आले आहे'

ममता यांनी भाजपचे नाव न घेता सांगितले की, तृणमूल काँग्रेस सोडणारे नेते भाजपच्या 'वॉशिंग मशीन'मध्ये आणि भाजप पुरस्कृत तृणमूलच्या बंडखोर गटात जात आहेत. त्या म्हणाल्या, "जी व्यक्ती (मदन मित्रा) आज गेली, तिने कालच आम्हाला सांगितले होते की तिला आणि तिच्या कुटुंबाला समन्स मिळाले आहे. तेव्हाच आम्हाला समजले होते की ते पक्ष बदलू शकतात. ज्यांची 'सेटिंग' आहे, ते भाजपच्या वॉशिंग मशीनमध्ये जात आहेत."




# भारतातील चाहत्यांसाठी मोठी निराशाजनक बातमी

हॉलिवूडचे प्रसिद्ध दिग्दर्शक ख्रिस्तोफर नोलन यांच्या आगामी 'द ओडिसी' या चित्रपटाची जगभरात प्रचंड उत्सुकता आहे. भारतातील सिनेरसिकही हा चित्रपट मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी आतुर झाले आहेत. अनेक जण सर्वोत्तम अनुभवासाठी महागडी आयमॅक्स (IMAX) तिकिटे बुक करण्याची तयारी करत आहेत. मात्र, ३ ते ४ हजार रुपये खर्च करूनही भारतीय प्रेक्षकांना या चित्रपटाचा नोलन यांनी अपेक्षित केलेला खरा सिनेमॅटिक अनुभव मिळणार नसल्याची माहिती समोर आली आहे. यामागचे मुख्य कारण म्हणजे भारतात खऱ्या 70MM IMAX प्रोजेक्शनची सुविधा नसणे. ख्रिस्तोफर नोलन यांनी 'द ओडिसी' हा चित्रपट अत्याधुनिक 70MM IMAX कॅमेऱ्यांवर चित्रित केला आहे. या तंत्रज्ञानामुळे चित्रपट अधिक मोठ्या फ्रेममध्ये, अधिक स्पष्ट आणि वास्तववदर्शी दिसतो. मात्र, हा अनुभव घेण्यासाठी विशेष प्रकारचा 70MM IMAX प्रोजेक्टर आणि विशाल स्क्रीन आवश्यक असते. सध्या भारतातील बहुतांश IMAX थिएटरमध्ये डिजिटल किंवा लेझर प्रोजेक्शन तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. ही प्रणाली सामान्य स्क्रीनपेक्षा निश्चितच अधिक चांगली असली, तरी ती 70MM IMAXच्या दर्जाशी तुलना करू शकत नाही. त्यामुळे भारतीय प्रेक्षकांना चित्रपटाची कथा, अभिनय आणि दृश्यांचा आनंद मिळेल, पण नोलन यांनी ज्या भव्य स्वरूपात हा चित्रपट तयार केला आहे, तो पूर्णपणे अनुभवता येणार नाही. मुंबई, दिल्ली-एनसीआर, बेंगळुरू, चेन्नई यांसारख्या मोठ्या शहरांमध्ये IMAX थिएटर्स आहेत. मात्र, त्यापैकी एकाही व्यावसायिक थिएटरमध्ये मूळ 70MM IMAX प्रोजेक्शनची सुविधा उपलब्ध नाही.

# राणी मुखर्जीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा!



बॉलिवूडमधील दमदार अभिनेत्री राणी मुखर्जी हिच्या चाहत्यांसाठी आनंदाची बातमी आहे. भारतीय चित्रपटसृष्टीतील उल्लेखनीय योगदान आणि समाजासाठी केलेल्या कार्याची दखल घेत ऑस्ट्रेलियातील ला ट्रोब विद्यापीठ राणी मुखर्जीला 'डॉक्टर ऑफ लेटर्स' (Honorary Doctor of Letters) ही मानद डॉक्टरेट प्रदान करणार आहे. हा सन्मान तिला इंडियन फिल्म फेस्टिव्हल ऑफ मेलबर्न (IFFM) 2026 दरम्यान दिला जाणार आहे. हा विशेष सन्मान १४ ऑगस्ट २०२६ रोजी ऑस्ट्रेलियातील मेलबर्न येथील फेडरेशन स्क्वेअर येथे आयोजित करण्यात येणाऱ्या विशेष समारंभात प्रदान केला जाईल. हा कार्यक्रम इंडियन फिल्म फेस्टिव्हल ऑफ मेलबर्न २०२६ चा एक भाग असणार आहे. यंदाचा हा चित्रपट महोत्सव १३ ते २३ ऑगस्ट २०२६ या कालावधीत आयोजित केला जाणार आहे. राणी मुखर्जीला हा सन्मान दोन महत्वाच्या कारणांसाठी दिला जात आहे. पहिले म्हणजे भारतीय चित्रपटसृष्टीतील तिचा जवळपास तीन दशकांचा यशस्वी अभिनय प्रवास, आणि दुसरे म्हणजे सामाजिक प्रश्नांबाबत सातत्याने केलेले तिचे योगदान. राणीने आपल्या कारकिर्दीत अनेक गाजलेल्या आणि आशयघन चित्रपटांमध्ये काम केले आहे. 'ब्लॅक', 'हिचकी', 'मर्दानी' आणि 'मिसेस चॅटर्जी व्हर्सेस नॉर्वे' यांसारख्या चित्रपटांमधून तिने महिलांचे हक्क, शिक्षण, मानसिक आरोग्य, सामाजिक न्याय आणि महिलांच्या सक्षमीकरणासारखे महत्त्वाचे विषय प्रभावीपणे मांडले. तिच्या अभिनयामुळे या चित्रपटांना प्रेक्षकांसोबतच समीक्षकांचीही मोठी पसंती मिळाली.

# 'बंद करा..!' मौनी रॉय पापाराझींवर संतापली



अभिनेत्री मौनी रॉयचा एक व्हिडिओ सध्या सोशल मिडियावर व्हायरल होत आहे. ज्यात ती पापाराझींवर भडकल्याचे पाहायला मिळाले. एका रेस्टॉरंटमधून मौनी रॉय आणि अभिनेत्री अनुषा दांडेकरसोबत बाहेर पडली होती, जिथे तिला अस्वस्थ करणाऱ्या प्रसंगाला सामोरे जावे लागले. व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये, मौनी रॉय तिच्या गाडीत बसताना दिसत आहे. ती कारमध्ये बसल्यानंतरही फोटोग्राफर्स सातत्याने तिचे फोटो आणि व्हिडिओ काढत होते. सततच्या फोटोग्राफी आणि वीडियोग्राफीमुळे अभिनेत्री चांगलीच चिडलेली दिसली. मौनी रॉयने पापाराझींना वारंवार थांबायला सांगितले. पण, जेव्हा ते ऐकले नाहीत, तेव्हा तिने कडक शब्दात सुनावले, "बंद करा!" मौनी चिडलेली आहे हे स्पष्ट दिसतं. यानंतर अनुषा दांडेकर परिस्थिती सांभाळण्यासाठी येते. ती पापाराझींना थांबण्याचा इशारा करते. दरम्यान, मौनी रॉय पती सूरज नांबियारसोबत विभक्त झाली. यानंतर मौनीने माध्यमांसमोर येणं टाळलं. घटस्फोटाची घोषणा केल्यानंतर मौनी कान्सला गेली होती. तेव्हाही जाताना मुंबई विमानतळावर तिने पापाराझींकडे दुर्लक्ष करणंच पसंत केलं होतं. मौनी रॉयने अनेक वर्षे डेट केल्यानंतर २७ जानेवारी २०२२ रोजी सुरजशी लग्न केले होते. त्यांचे लग्न मल्याळी आणि बंगाली अशा दोन्ही परंपरांनुसार पार पडले होते. मात्र १४ मे रोजी मौनीने सुरजसोबत एक जॉइंट पोस्ट शेअर करत ते विभक्त होत असल्याचे जाहीर केले.



# शुभमन गिल अव्वल स्थानाच्या उंबरठ्यावर

## विराट, रोहितसह 'टॉप ५' मध्ये टीम इंडियाचा दबदबा; मिचेल पहिल्या स्थानावर

महाईन्यूज । दुबई

**भारत आणि इंग्लंड दरम्यान सध्या अत्यंत चुरशीची एकदिवसीय (ODI) मालिका खेळवली जात आहे. या मालिकेतील पहिल्याच सामन्यात भारतीय संघाने उत्कृष्ट कामगिरीचे प्रदर्शन करत शानदार विजय नोंदवला. या विजयाच्या जल्लोषादरम्यानच आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (ICC) ताजी क्रमवारी जाहीर केली आहे. या नव्या क्रमवारीत भारतीय संघाचा कर्णधार शुभमन गिल याला रेटिंग गुणांमध्ये मोठा फायदा झाला असून, तो आता जगातील अव्वल फलंदाज बनण्याच्या अगदी जवळ पोहोचला आहे.**



एकीकडे शुभमन गिल अव्वल स्थानाकडे कूच करत असताना, दुसरीकडे भारताचे दिग्गज फलंदाज विराट कोहली आणि रोहित शर्मा यांनीही अव्वल ५ मध्ये आपले स्थान टिकवून ठेवले आहे. ताज्या क्रमवारीत विराट कोहली ७५७ रेटिंग गुणांसह तिसऱ्या स्थानावर, तर रोहित शर्मा ७४४ गुणांसह चौथ्या स्थानावर कायम आहे.

इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात या दोन्ही अनुभवी फलंदाजांना मोठी धावसंख्या उभारता आली नसली, तरी त्यांचे क्रमवारीतील स्थान सुरक्षित राहिले आहे. मात्र, आगामी दोन सामन्यांत या दोन्ही खेळाडूंना 'टॉप ५' मधील आपले स्थान राखण्यासाठी किमान एक मोठी खेळी करावीच लागेल, अन्यथा त्यांच्या क्रमवारीत घसरण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

टीम इंडियाची सलग पराभवांची नकोशी मालिका अखेर संपुष्टात आली आहे. आयर्लंडविरुद्धचे दोन आणि इंग्लंडविरुद्धचे चार टी-२० सामने गमावल्यानंतर टीम इंडियाला पहिला विजय मिळाला आहे. एजबेस्टन येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या वनडे सामन्यात भारताने यजमान इंग्लंडचा ६ गडी राखून पराभव केला. यासह यजमान इंग्लंडला १२ वर्षांनंतर पहिल्यांदाच एजबेस्टनवर पराभव पत्करावा लागला आहे.

### गिलच्या रेटिंगमध्ये मोठी झेप

ताज्या आकडेवारीनुसार, १४ जुलैच्या संध्याकाळपर्यंत शुभमन गिलचे रेटिंग गुण ७९१ होते, तर डॅरिल मिचेल ८१५ गुणांवर होता. मात्र, अवघ्या २४ तासांत म्हणजेच पहिल्या सामन्यातील कामगिरीनंतर गिलच्या रेटिंग गुणांमध्ये वाढ होऊन ते ८०३ वर पोहोचले आहेत. भारत आणि इंग्लंड मालिकेतील अजून दोन सामने शिल्लक असल्याने, पुढील सामन्यात एक दर्जेदार खेळी साकारून डॅरिल मिचेलला मागे टाकण्याची आणि जागतिक क्रमवारीत पहिल्या स्थानावर झेप घेण्याची सुवर्णसंधी शुभमन गिलकडे असणार आहे. भारत आणि इंग्लंड यांच्यातील पहिल्या एकदिवसीय सामन्यात गिलने केलेल्या महत्त्वपूर्ण फलंदाजीचा फायदा त्याला या क्रमवारीत मिळाला आहे.

### मिचेल पहिल्या, तर गिल दुसऱ्या स्थानावर

आयसीसीने जारी केलेल्या ताज्या एकदिवसीय क्रमवारीत न्यूझीलंडचा स्टार फलंदाज डॅरिल मिचेल गेल्या अनेक दिवसांपासून अव्वल स्थानी विराजमान आहे. नव्या क्रमवारीतही त्याचे पहिले स्थान अबाधित असले, तरी आता त्याच्या या बादशाहीला शुभमन गिलकडून थेट आव्हान मिळताना दिसत आहे. सध्या डॅरिल मिचेल ८१४ रेटिंग गुणांसह पहिल्या स्थानावर आहे, तर शुभमन गिलने रेटिंगमध्ये लक्षणीय सुधारणा करत ८०३ गुणांसह दुसरे स्थान मजबूत केले आहे.

# फ्रान्सचा पराभव, पण एम्बाप्पेचा वर्ल्ड रेकॉर्ड! इतिहास घडवला

महाईन्यूज । फ्रान्स

**फिफा वर्ल्डकप २०२६ स्पर्धेतील पहिल्या सेमी फायनलचा सामना फ्रान्स आणि स्पेन या दोन्ही बलाढ्य संघांमध्ये पार पडला. या सामन्यात फ्रान्सला २-० ने पराभवाचा सामना करावा लागला आहे. हा सामना जिंकून स्पेनचा संघ फायनलसाठी पात्र ठरला आहे. हा सामना फ्रान्सने गमावला, पण फ्रान्सचा कर्णधार किलियन एमबाप्पेने मैदानात उतरताच या स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.**



२७ वर्षीय किलियन एमबाप्पे हा फुटबॉल वर्ल्डकपमध्ये फ्रान्ससाठी सर्वाधिक सामने खेळणारा खेळाडू ठरला आहे.

स्पेनविरुद्धचा सामना हा फ्रान्सचा कर्णधार किलियन एमबाप्पेसाठी अतिशय महत्वाचा होता. कारण हा सामना जिंकून फ्रान्सकडे सलग तिसऱ्यांदा फिफा वर्ल्डकप स्पर्धेची फायनल खेळण्याची संधी होती. पण ही संधी थोडक्यात हुकली. सामना गमावला असला तरीदेखील मैदानात उतरताच किलियन एमबाप्पेने एक वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे. हा त्याचा वर्ल्डकप कारकिर्दीतील २१ वा सामना होता. यासह त्याने फिफा वर्ल्डकप स्पर्धेत फ्रान्ससाठी सर्वाधिक सामने खेळण्याचा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे. यादरम्यान त्याने फ्रान्सचा माजी कर्णधार आणि गोलरक्षक ह्युगो लॉरिसचा रेकॉर्ड मोडून काढला आहे. ह्युगो लॉरिसच्या नावे २० सामने खेळण्याची नोंद आहे. तर तिसऱ्या स्थानी असलेल्या अँटोइन ग्रीझमनच्या नावे १९ सामने खेळण्याची नोंद आहे. तर चौथ्या स्थानी असलेल्या राफेल वराने आणि ऑलिव्हियर जिरू यांच्या नावे प्रत्येकी १८-१८ सामने खेळण्याची नोंद आहे.

किलियन एमबाप्पे फ्रान्सकडून खेळताना अनेक मोठे रेकॉर्ड आपल्या नावावर केले आहेत. त्याने फिफा वर्ल्डकप स्पर्धेत फ्रान्सकडून खेळताना आतापर्यंत सर्वाधिक २० गोल केले आहेत. तो वर्ल्डकपमध्ये फ्रान्ससाठी सर्वाधिक गोल करणारा खेळाडू आहे. तर दुसऱ्या स्थानी असलेल्या जस्ट फॉन्टेनच्या नावे १३ गोल करण्याची नोंद आहे. यासह त्याच्या नावे आणखी एका खास रेकॉर्डची नोंद आहे. किलीयम एम्बाप्पे हा वयाची ३० वर्ष पूर्ण करण्याआधी वर्ल्डकपमध्ये २० गोल करणारा जगातील पहिलाच आणि एकमेव खेळाडू आहे.

### फ्रान्सचा पराभव

सेमीफायनलमध्ये फ्रान्सला स्पेनविरुद्ध खेळताना हवी तशी कामगिरी करता आलेली नाही. फ्रान्सला जेतेपदासाठी प्रबळ दावेदार मानलं जात होतं. पण फ्रान्सचा संघ या सामन्यात एकही गोल करु शकलेला नाही. २२ व्या मिनिटाला स्पेनला पहिली पेनल्टी किक मिळाली, या संधीचा स्पेनने फायदा घेत पहिला गोल केला. मिकेल ओयारजबालने पहिला गोल करुन स्पेनला १-० ने आघाडी मिळवून दिली. त्यानंतर ५८ व्या मिनिटाला पुन्हा एकदा पेड्रो पेरोने गोल केला आणि स्पेनला २-० ने आघाडी मिळवून दिली.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज ™

ePaper

। गुरुवार ।
दि. 16 जुलै 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# शहरातील विजेचा खेळखंडोबा कायम; नागरिक त्रस्त, तोडगा कधी?

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

पिंपरी-चिंचवड शहरातील मोशी, चऱ्होली फाटा, डुडुळगाव, वडमुखवाडी, चिखली आदी परिसरात वारंवार होणाऱ्या वीजपुरवठा खंडित होण्याच्या प्रकारामुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. तासनतास वीज नसल्याने लिफ्ट बंद पडणे, पाणीपुरवठा ठप्प होणे, इंटरनेट सेवा विस्कळीत होणे आणि सोसायट्यांना डिझेल जनरेटरवर अवलंबून राहावे लागणे, अशा समस्यांचा सामना नागरिकांना करावा लागत आहे.


चऱ्होली फाटा परिसरातील एसीई आस्था, तनिष्क ऑर्चिड आणि आसपासच्या गृहनिर्माण संस्थांमध्ये गेल्या दोन आठवड्यांपासून वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याची तक्रार आहे. त्यामुळे अत्यावश्यक सेवा सुरू ठेवण्यासाठी सोसायट्यांचा जनरेटरवरील खर्च वाढला असून त्याचा आर्थिक भारही रहिवाशांवर पडत आहे.


वीजपुरवठा नेमका का खंडित झाला, तो कधी पूर्ववत होणार याबाबत महावितरणकडून वेळेवर माहिती मिळत नसल्याची नाराजी नागरिकांनी व्यक्त केली आहे. वारंवार तक्रारी करूनही कायमस्वरूपी उपाययोजना होत नसल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे. त्यातच वीजपुरवठा खंडित होत असतानाही नियमित आणि वाढीव वीजबिले येत असल्याने संताप व्यक्त होत आहे.

दरम्यान, या गंभीर समस्येची दखल घेत चिखली-मोशी पिंपरी-चिंचवड हाउसिंग फेडरेशन पुढाकार घेणार आहे. महावितरणचे अधिकारी, लोकप्रतिनिधी, संबंधित विभाग आणि विविध गृहनिर्माण संस्थांच्या प्रतिनिधींची लवकरच संयुक्त बैठक आयोजित करण्यात येणार आहे. शहराच्या वाढत्या लोकसंख्येनुसार वीज पायाभूत सुविधा सक्षम करण्याची मागणीही यावेळी करण्यात येणार असल्याची माहिती फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी दिली.

### नागरिकांच्या प्रमुख तक्रारी

मोशी, चऱ्होली फाटा, डुडुळगाव, वडमुखवाडी आणि चिखली परिसरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत आहे. त्यामुळे लिफ्ट, पाणीपुरवठा आणि इंटरनेट सेवा विस्कळीत होत असून सोसायट्यांना डिझेल जनरेटरवर लाखो रुपयांचा अतिरिक्त खर्च करावा लागत आहे. वारंवार वीज जात असतानाही नियमित वीजबिले येत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.



# मोशी दुर्घटना; प्रश्न व्यक्तीचा की व्यवस्थेचा?

## नऊ निष्पाप मृत्यूंनंतर राजकीय वातावरण निर्मिती; चौकशीपूर्वी 'मीडिया ट्रायल'

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरात कोणतीही मोठी राजकीय, सामाजिक किंवा प्रशासकीय घडामोड घडली की, चर्चेच्या केंद्रस्थानी आमदार महेश लांडगे असतात. २०१९ आणि २०२४ च्या विधानसभा निवडणुका, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा पूर्णाकृती 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण' प्रकल्प, शहरातील विकासकामांवरील श्रेयवाद किंवा महापालिका निवडणूक-२०२६ची रणधुमाळी—प्रत्येक वेळी महेश लांडगे हेच राजकीय लक्ष्य ठरले आहेत, हा गेल्या काही वर्षांचा अनुभव आहे.**



### मोशी कचरा डेपोचा प्रश्न नेमका किती जुना आहे?

१९८२ पासून शहरातील कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न अस्तित्वात आहे. चार दशकांमध्ये अनेक सत्ताधारी आले आणि गेले. शहराची लोकसंख्या वाढली, कचऱ्याचे प्रमाण वाढले; पण दीर्घकालीन आणि वैज्ञानिक उपाययोजनांचे नियोजन कितपत झाले? गेल्या ३० ते ४० वर्षांत या प्रश्नावर कोणत्या ठोस उपाययोजना राबविण्यात आल्या? हा प्रश्नही तेवढ्याच ताकदीने विचारला जाणे आवश्यक आहे. मोशी दुर्घटना ही केवळ नैसर्गिक आपत्ती होती की, त्यामागे व्यवस्थेतील काही त्रुटी होत्या? अतिवृष्टीमुळे ही घटना घडली असेल, तर आपत्ती व्यवस्थापनाची तयारी पुरेशी होती का? कचऱ्याच्या ढिगाऱ्याबाबत कोणत्या सूचना देण्यात आल्या होत्या? संबंधित यंत्रणांनी वेळेत उपाययोजना केल्या होत्या का? या सर्व प्रश्नांची उत्तरे चौकशीतून समोर येतील.

मोशी येथील दुर्दैवी दुर्घटनेनंतरही हे चित्र बदललेले दिसले नाही. नऊ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला, अनेक कुटुंबांचा आधार हरपला, संपूर्ण शहर शोकसागरात बुडाले. मात्र, बचावकार्य सुरू असतानाच राजकीय आरोप-प्रत्यारोपांना सुरुवात झाली.

मोशी दुर्घटनेबाबत चौकशी पूर्ण होण्यापूर्वीच काही राजकीय नेत्यांनी आमदार महेश लांडगे आणि त्यांच्या कुटुंबीयांवर थेट अथवा अप्रत्यक्ष आर्थिक हितसंबंधांचे आरोप करण्यास सुरुवात केली. लोकशाहीत प्रश्न विचारण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे; परंतु, आरोपांना पुराव्यांची जोड असणेही तेवढेच आवश्यक आहे. जर कोणाकडे ठोस दस्तऐवज असतील, तर ते चौकशी यंत्रणांसमोर आणि जनतेसमोर मांडले जावेत. अन्यथा, केवळ राजकीय असुयेच्या आधारे कोणालाही दोषी ठरवणे म्हणजे बौद्धीक दिवाळखोरी म्हणावी लागेल.

दुसरीकडे, २०१७ नंतर शहरात अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांना गती मिळाल्याचे दिसते. मग, भामा-आसखेड पाणी योजना, पवना बंद पाइपलाइन, मोशी हॉस्पिटल, आयआयएम, वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्प, बायोमायनिंग, ३७५ बायोगॅस प्रकल्प आणि ५० टीपीडी हॉटेल वेस्ट-टू-बायोगॅस प्रकल्प यांचा त्यात समावेश आहे. आता या सर्व प्रकल्पांसाठी निविदा प्रक्रिया, इस्टिमेट कमिटी, टेंडर कमिटी, स्थायी समिती आणि महासभेची मंजुरी आवश्यक असते. त्यामुळे कोणत्याही प्रकल्पात अनियमितता झाल्याचा आरोप असेल, तर त्याची चौकशी झालीच पाहिजे; पण चौकशीपूर्वी निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही. मात्र, असा नतद्रष्टपणा काही कथित माध्यमकर्मी हेतूपुरस्सर करीत असून, पिंपरी-चिंचवडमधील राजकीय वातावरण भडकावण्याचा प्रयत्न करीत आहेत.

या सगळ्या गदारोळात आणखी एक मुद्दा समोर येत आहे. ५० टीपीडी हॉटेल वेस्ट-टू-बायोगॅस प्रकल्पाबाबत राजकीय वर्तुळात चर्चा रंगू लागली आहे. हा प्रकल्प डीएम (DM) कंपनीकडे असल्याचा दावा केला जात असून, या संदर्भात भाऊसाहेब भोईर यांचा संबंध आहे, अशीही चर्चा आहे. जर एका बाजूला महेश लांडगे यांच्याबाबत प्रश्न उपस्थित केले जात असतील, तर दुसऱ्या बाजूला ५० टीपीडी प्रकल्पाची मालकी, भागीदारी आणि संबंधित हितसंबंध यांची माहितीही जनतेसमोर येणे आवश्यक आहे. लोकशाहीत प्रश्न विचारताना सर्वांसाठी समान निकष असणे गरजेचे आहे.

# 'देऊळ बंद-२' निमित्त राहुल कलाटेंचा मराठी संस्कृती जपण्याचा पुढाकार!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**वाकड, ताथवडे आणि पुनावळे परिसरातील नागरिकांना मराठी चित्रपटसृष्टीचा अनोखा अनुभव देत भाजपा नगरसेवक राहुलदादा कलाटे यांनी पुन्हा एकदा सामाजिक आणि सांस्कृतिक बांधिलकी जपल्याचे दिसून आले. त्यांच्या पुढाकारातून वाकड येथील INOX MEGAPLEX, PHOENIX MALL OF THE MILLENNIUM येथे मराठीतील सुपरहिट चित्रपट 'देऊळ बंद-२' च्या विशेष स्क्रीनिंगचे आयोजन करण्यात आले.**




> "मराठी भाषा, संस्कृती आणि चित्रपटसृष्टी ही आपल्या अस्मितेची ओळख आहे. 'देऊळ बंद-२'सारखे आशयघन चित्रपट समाजाला नवा विचार देतात. अशा कलाकृती अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचाव्यात, यासाठी हा छोटासा प्रयत्न आहे. भविष्यातही सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांशी नाळ जपण्याचा माझा प्रयत्न कायम राहील. कार्यक्रमाच्या शेवटी एवढेच म्हणेन की, भविष्यातही अशा सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन व्हावे."
>
> **- राहुल कलाटे, नगरसेवक, भाजपा.**

या उपक्रमाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत राहुलदादा कलाटे यांच्या कार्याचे कौतुक केले.

राजकारणाबरोबरच सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातही सक्रिय असलेल्या राहुलदादा कलाटे यांनी मराठी भाषा, कला आणि संस्कृतीच्या जतनासाठी हा उपक्रम राबविला. विशेष म्हणजे, या कार्यक्रमामुळे शेकडो नागरिकांना आपल्या कुटुंबासह मराठी चित्रपटाचा आनंद घेण्याची संधी मिळाली.

कार्यक्रमाला चित्रपटाचे लेखक, दिग्दर्शक आणि अभिनेते प्रवीण तरडे तसेच अभिनेत्री स्नेहल तरडे यांनी विशेष उपस्थिती लावली. त्यांनी प्रेक्षकांशी संवाद साधत चित्रपटामागील कथा, त्याचा सामाजिक संदेश आणि मराठी चित्रपटसृष्टीच्या प्रवासाविषयी मनोगत व्यक्त केले. कलाकारांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

राहुल कलाटे यांनी यावेळी बोलताना, "मराठी संस्कृती आणि मराठी चित्रपटांना प्रोत्साहन देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. समाजाला विचार करायला लावणारे आणि सकारात्मक संदेश देणारे चित्रपट अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचले पाहिजेत," असे मत व्यक्त केले. वाकड परिसरात विविध विकासकामांसोबतच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून नागरिकांशी कायम संवाद ठेवणारे नेतृत्व म्हणून राहुलदादा कलाटे यांची ओळख निर्माण झाली आहे. 'देऊळ बंद-२'च्या विशेष स्क्रीनिंगच्या माध्यमातून त्यांनी पुन्हा एकदा नागरिकांच्या मनात आपले वेगळे स्थान अधोरेखित केले. मराठी चित्रपटसृष्टीला बळ देण्याच्या दिशेने उचललेले हे पाऊल निश्चितच कौतुकास्पद असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत होती.

# डॉ. सुशांत पाटील ग्रुपचा वारीसेवा २०२६ उपक्रम

## २०० हून अधिक स्वयंसेवकांनी २२ तास अखंड सेवा बजावली; अभूतपूर्व प्रतिसाद

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**अनुजा सुशांत पाटील ग्लोबल फाउंडेशन यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या "डॉ. सुशांत पाटील ग्रुप वारीसेवा २०२६" या सेवाभावी उपक्रमाची यंदा अत्यंत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वी सांगता झाली. आषाढी वारीच्या निमित्ताने वारकऱ्यांच्या सेवेसाठी तब्बल २०० हून अधिक स्वयंसेवक, डॉ. सुशांत पाटील ग्रुपचे अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी सलग २२ तासांहून अधिक काळ निस्वार्थपणे सेवा दिली.**



या सेवा उपक्रमात हजारो वारकऱ्यांना गरमागरम भोजन, पावसापासून संरक्षणासाठी रेनकोट व छत्र्यांचे वितरण, पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या तसेच इतर आवश्यक साहित्य वाटप करण्यात आले. यासोबतच विठ्ठल भक्तीमय वातावरण अधिक आनंददायी करण्यासाठी भजन, अभंग आणि सांस्कृतिक सादरीकरणांद्वारे वारकऱ्यांचे स्वागत करण्यात आले.

या सेवाभावी उपक्रमामागे संस्थापक डॉ. सुशांत व्ही. पाटील आणि व्यवस्थापकीय संचालक ॲड. अनुजा सुशांत पाटील यांचे प्रेरणादायी नेतृत्व लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीरित्या पार पडला. तसेच कार्यकारी संचालक मा. विद्यानंद मानकर सर यांनीही या सेवाकार्यात मोलाचे सहकार्य केले.

या प्रसंगी प्राचार्य डॉ. सुरेश माळी, डॉ. सुरेश शिरभादुरकर, डॉ. मेघना भिलारे, प्रो. राजाराम गोलगिरे, केंद्रीय कुलसचिव श्री. प्रदीप खांडवे, मुख्य लेखाधिकारी श्री. संजय भोर, तसेच मुख्य वित्त अधिकारी (CFO) श्री. रोहन पवार, यांची विशेष उपस्थिती लाभली. या संपूर्ण वारीसेवा उपक्रमाचे क्रिएटिव्ह आणि कल्चरल डायरेक्टर श्री. श्रेयस देशपांडे यांनी प्रभावी समन्वय साधत यशस्वी नियोजन केले.

विद्यार्थी व स्वयंसेवक व्यवस्थापनाची जबाबदारी राजवर्धन गडेकर, एचआर मधुरा शिंदे, एचआर मिहीर जाधव, ईए नॅन्सी कोवान, सिद्धू जाधव, प्रा. आकाश गायकवाड, इंदू सिंह, श्रद्धा पेंडलवार, प्रा. सुमित हुलावळे, निखिला आल्हाट, सविता मोरे, रामेश्वर शेंडगे आणि एचआर प्राची यांनी यशस्वीरित्या सांभाळली.

याशिवाय मयूर तातुसकर, अंकुर शिवरकर आणि संदीप इनामके स्टुडिओ यांनी निःस्वार्थपणे दिलेल्या सहकार्याबद्दल संस्थेतर्फे विशेष आभार व्यक्त करण्यात आले.या उपक्रमाच्या यशात २०० हून अधिक स्वयंसेवकांचे समर्पण, सेवाभाव आणि विठ्ठल भक्ती हेच खरे बळ ठरले. "सेवाच ही खरी भक्ती" हा संदेश देत डॉ. सुशांत पाटील ग्रुपने सामाजिक बांधिलकीचा एक आदर्श समाजासमोर ठेवला. "माऊली माऊली!" च्या अखंड जयघोषात हा सेवायज्ञ अविस्मरणीय ठरला.

### सांस्कृतिक समितीचे नेतृत्व सिद्धू जाधव यांनी केले.

अन्न तयार करणे व वितरण व्यवस्थापन परमेश्वर राऊत, अतुल धुमाळ, विठ्ठल राऊत आणि सूरज यांनी केले. तर खरेदी व साहित्य वितरणाची जबाबदारी जीवन बाजारे, सुशांत जोशी, अक्षय आणि लक्ष्मण मस्तुदे, समीर, अजित यांनी सांभाळली.उपक्रमाचे चित्रीकरण व SOCIAL MEDIA जबाबदारी उन्मेष कोरडे, मंगेश ढोले, जय पाटोळे, निखिल लाडे, राजू पळसकर, विवेक जोरी, शुभम हार्डीकर, राज इंगोले आणि त्यांच्या मीडिया टीमने उत्कृष्टरीत्या पार पाडली.

# वृक्षवल्ली' उपक्रमातून एमआयटी आळंदीच्या विद्यार्थ्यांकडून ७०० जांभूळ वृक्षांचे रोपन

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**वनमहोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, आळंदी येथील राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाने 'गिव्ह मी ट्रीज ट्रस्ट'च्या सहकार्याने 'वृक्षवल्ली' या वृक्षारोपण मोहिमेअंतर्गत केसनांद (ता. हवेली) येथील वनविभागाच्या सुमारे दोन एकर जागेवर तब्बल ७०० देशी जांभूळ वृक्षांची लागवड केली.**






या उपक्रमात महाविद्यालयातील ३५ एनएसएस स्वयंसेवक, पाच प्राध्यापक आणि गिव्ह मी ट्रीज ट्रस्टचे दहा सदस्य अशा एकूण ५० जणांनी उत्साहाने सहभाग घेतला. वृक्षारोपणापूर्वी स्वयंसेवकांनी आणि ट्रस्टच्या कार्यकर्त्यांनी जवळपास चार तास श्रमदान करून जमीन लागवडीसाठी तयार केली. त्यानंतर नियोजनबद्ध पद्धतीने देशी जांभूळ रोपांची लागवड करण्यात आली.

पर्यावरणाचा समतोल राखणे, जैवविविधतेचे संवर्धन करणे आणि हरित आच्छादन वाढविणे या उद्देशाने दीर्घकाळ टिकणारी व उच्च जगण्याचा दर असलेली देशी जांभूळ प्रजाती निवडण्यात आल्याची माहिती आयोजकांनी दिली. यावेळी संस्थेचे संचालक डॉ. बी. बी. वाफारे, डॉ. शरद कदम, डॉ. सुनील महाजन आणि डॉ. राहुल बाराथे यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन करत पर्यावरण रक्षणासाठी युवकांनी सक्रिय भूमिका बजावण्याचे आवाहन केले. एनएसएस कार्यक्रम अधिकारी अरविंद वागस्कर यांनी वृक्षारोपणाचे महत्त्व, पर्यावरणीय शाश्वतता आणि निसर्गसंवर्धनात युवकांचे योगदान यावर मार्गदर्शन केले.

### वृक्ष संगोपन व संवर्धनाची घेतली शपथ

'गिव्ह मी ट्रीज ट्रस्ट'चे कार्यक्रम अधिकारी सिद्धार्थ गायकवाड यांनी संस्थेच्या विविध पर्यावरणपूरक उपक्रमांची माहिती देत स्वयंसेवकांना वृक्षसंवर्धनासाठी प्रेरित केले. कार्यक्रमाच्या समारोपावेळी सर्व स्वयंसेवकांनी लागवड केलेल्या रोपांचे संगोपन व संरक्षण करण्याची शपथ घेत हरित आणि शाश्वत भविष्यासाठी कटिबद्ध असल्याचा निर्धार व्यक्त केला.

# मोशी दुर्घटना: मुख्य अभियंत्यासह दोघे निलंबित

## महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले दोघांच्या विभागीय चौकशीचे आदेश

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**मोशी कचरा डेपोत घडलेल्या भीषण दुर्घटनेप्रकरणी महापालिकेच्या पर्यावरण विभागाचे मुख्य अभियंता संजय कुलकर्णी आणि कार्यकारी अभियंता योगेश आल्हाट यांना निलंबित करण्यात आले आहे. त्यांची विभागीय चौकशी करण्याचे आदेश आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांनी दिले आहेत. कर्तव्यात निष्काळजीपणा, शासकीय कामात हलगर्जीपणा, अधिकारांचा गैरवापर करून अनधिकृत बांधकामास अभय दिल्याचा ठपका दोघांवर ठेवण्यात आला आहे.**



पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मोशी कचरा डेपोत 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्पाच्या तीन मजली अनधिकृत इमारतीवर कचऱ्याचा डोंगर कोसळून झालेल्या या भीषण दुर्घटनेत नऊ कामगारांचा मृत्यू झाला असून १२ कामगार जखमी झाले आहेत. या घटनेप्रकरणी अँटोनी लारा रिन्युव्हेबल एनर्जी कंपनीला दुर्लक्ष, कर्तव्यात कसुर आणि सुरक्षेतील गंभीर निष्काळजीपणाबाबत महापालिका आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांनी सोमवारी कारणे दाखवा नोटीस बजाविली होती. मंगळवार सायंकाळी पाच वाजेपर्यंत खुलासा न केल्यास कंत्राट रद्द आणि बँक हमी जप्त करण्याचा इशारा दिला होता. त्यानुसार कंपनीने मंगळवारी खुलासा सादर केला आहे.

त्याचबरोबर महापालिकेच्या पर्यावरण विभागाचे मुख्य अभियंता संजय कुलकर्णी आणि कार्यकारी अभियंता योगेश आल्हाट यांचा पदभार काढून त्यांनाही आयुक्तांनी कारणे दाखवा नोटीस बजावून मंगळवारी सायंकाळी पाच वाजेपर्यंत खुलासा सादर करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार दोघांनीही खुलासे सादर केले होते. दोघांचेही खुलासे असमाधानकारक, तथ्यहीन आणि शासकीय व महापालिका नियमांचे समर्थन करणारे नसल्याचे म्हटले आहे. कर्तव्यात निष्काळजीपणा, शासकीय कामात हलगर्जीपणा, अधिकारांचा गैरवापर करून अनधिकृत बांधकामास अभय दिल्याचा ठपका दोघांवर ठेवण्यात आला आहे.

मोशी कचरा डेपोतील कचऱ्याचे स्खलन होऊन 'वेस्ट-टू-एनर्जी' प्रकल्पाची अनधिकृत इमारत कोसळून नऊ कामगारांचा मृत्यू झालेल्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी राज्य शासनाने समितीची स्थापना केली आहे.

### समितीची कार्यकक्षा आणि चौकशीचे प्रमुख मुद्दे

समितीने दुर्घटनेचे तात्कालिक कारण आणि मूळ कारण निश्चित करणे, कचरा घसरण्यामागील तांत्रिक, भू-तांत्रिक, भौगोलिक, हवामानविषयक आणि जलनिकासी घटकांचा सखोल अभ्यास करणे, कचऱ्याच्या ढिगाऱ्याची उंची, उतार आणि सुरक्षितता निर्धारित तांत्रिक निकषांनुसार होती का, 'घनकचरा व्यवस्थापन, पर्यावरण नियमांचे उल्लंघन झाले आहे का, याची पडताळणी करणे, दुर्घटनाग्रस्त प्रशासकीय इमारतीचे स्थान, रचना आणि संरचनात्मक स्थिरता अभियांत्रिकी मानकांनुसार योग्य होती का, दुर्घटनेपूर्वी जमीन खचणे किंवा कचरा सरकण्याबाबत संबंधित अधिकारी, कर्मचारी,कंत्राटदारांना काही तक्रारी, संदेश, ई-मेलद्वारे इशारे मिळाले होते का, आणि त्यावर कोणती प्रतिबंधात्मक कारवाई केली का, याची पडताळणी करणे, संबंधित अधिकारी, कर्मचारी, कंत्राटदार, प्रकल्प व्यवस्थापन, सल्लागार, तांत्रिक संस्था यांच्या जबाबदाऱ्या आणि निष्काळजीपणाची तपासणी करणे, तांत्रिक त्रुटी किंवा नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधित अधिकारी, कर्मचारी, कंत्राटदाराविरुद्ध शिस्तभंग आणि फौजदारी कारवाईची शिफारस करणे, वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्प सुरक्षित करण्यासाठी तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन कृती आराखडा आणि पूर्वसूचना प्रणाली सुचविण्याबाबत आदेश दिले आहेत.

# स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय व राज्यस्तरीय सायकल स्पर्धा

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे तथा महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे माजी अध्यक्ष आणि महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या वतीने पुणे-बारामती राष्ट्रीय व राज्यस्तरीय सायकल स्पर्धा २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा बुधवार, दि. २२ जुलै २०२६ रोजी होणार असून, देशभरातील तसेच राज्यातील आघाडीचे सायकलपटू या स्पर्धेत सहभागी होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.**




सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया आणि सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या मान्यतेने आयोजित करण्यात येणारी ही स्पर्धा राष्ट्रीय दर्जाची असून,महाराष्ट्रातील सायकलिंगला प्रोत्साहन देण्याबरोबरच नवोदित खेळाडूंना आपली गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी महत्त्वाचे व्यासपीठ उपलब्ध करून देणार आहे.

पुणे ते बारामती या मार्गावर होणाऱ्या या स्पर्धेत विविध गटांतील सायकलपटू सहभागी होणार असून, स्पर्धेचे आयोजन आंतरराष्ट्रीय निकषांनुसार करण्यात येणार आहे. खेळाडूंसाठी आवश्यक सुविधा, सुरक्षिततेचे नियोजन आणि स्पर्धेचे व्यवस्थापन याबाबतही विशेष काळजी घेण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या क्रीडा क्षेत्रातील योगदानाला अभिवादन करण्याबरोबरच युवकांमध्ये सायकलिंगची आवड वाढविणे, आरोग्यदायी जीवनशैलीचा प्रसार करणे आणि स्पर्धात्मक क्रीडा संस्कृतीला चालना देणे हा या स्पर्धेच्या आयोजनामागील प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले.

या राष्ट्रीय स्पर्धेमुळे महाराष्ट्रातील सायकलिंगला नवी दिशा मिळण्यास मदत होणार असून, राज्यातील उदयोन्मुख खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावर झळकण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. क्रीडा क्षेत्रात उत्कृष्टतेला प्रोत्साहन देत युवकांमध्ये शिस्त, जिद्द आणि फिटनेसची भावना अधिक दृढ करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे, असा ठाम विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

### पत्रकार परिषदेचे आयोजन

या स्पर्धेच्या अनुषंगाने सोमवार, दि. २० जुलै २०२६ रोजी दुपारी १२.०० ते १.०० या वेळेत पत्रकार भवन, गांजवे चौक, नवी पेठ, पुणे येथे पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेत संस्थेचे पदाधिकारी स्पर्धेची संपूर्ण रूपरेषा, सहभागी खेळाडू, स्पर्धेचा मार्ग, नियमावली तसेच आयोजनासंदर्भातील सविस्तर माहिती देणार आहेत. त्यासाठी सर्व पत्रकार बंधू भगिनींनी पत्रकार परिषदेसाठी सकाळी ११.४५ वाजता पत्रकार भवन येथे उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.